# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## Savitribai Phule Pune University

**(Formerly University of Pune)**

गणेशखिंड, पुणे-४११ ००७.
सभा, दप्तर व निवडणूक विभाग
दूरध्वनी क्र. : ०२० - २५६०११७/१८/२०
फॅक्स क्र. : ०२० - २५६९२०३१
ई-मेल : election@pun.unipune.ac.in

**Ganeshkhind, Pune-411007.**
**Records, Meeting & Election Section**
**Phone No. :** 020 - 25601117/18/20
**Fax No.:** 020 - 25692031
**Website :** www.unipune.ac.in

**संदर्भ क्र. : साफुपुविनि/38A** **दिनांक : १६ जून, २०१७.**

प्रति,

मा.अध्यक्ष/मा.सचिव
सर्व संलग्न महाविद्यालये व परिसंस्था यांचे
व्यवस्थापन मंडळ.

**विषय : संलग्न महाविद्यालय/परिसंस्था यांच्या व्यवस्थापन गटाने त्यांच्यामधून विद्यापीठ अधिसभेवर निवडून द्यावयाचे सहा प्रतिनिधींच्या निवडणुकींकरिता मतदार यादी तयार करण्यासाठी ऑनलाईन नाव नोंदणी करणेबाबत.**

महोदय / महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम (२८)(२)(त)((28)(2)(p)) अन्वये अधिसभेवर सहा (६) प्रतिनिधी संलग्न महाविद्यालय/परिसंस्था यांच्या व्यवस्थापन गटाने त्यांच्यामधून विद्यापीठ अधिसभेवर निवडून द्यावयाचे आहेत. यासंबंधीच्या तरतूदी खालीलप्रमाणे उध्दृत करण्यात येत आहेत.

**Definition**

Section 2 (37) "management" means the trustees or the managing or governing body, by whatever name called, of any trust registered under the Maharashtra Public Trusts Act, or any society registered under the Societies Registration Act, 1860 or a Company registered under section 8 of the Companies Act, 2013, under the management of which one or more colleges or recognized institutions or other institutions of higher learning, are conducted and admitted to the privileges of the university:

Provided that, in relation to any college or institution established or maintained by the Central Government or the State Government or a local authority like a Zilla Parishad, Municipal Council or Municipal Corporation, it means, respectively, the Central Government or the State Government or Zillia Parishad or the Municipal Council or the Municipal Corporation, as the case may be;

**Senate**

28(2)(p) six representatives of Management - to be elected from among the collegium of management representatives of the affiliated colleges or institutions out of whom one shall be from Scheduled Castes or Scheduled Tribes or Denotified Tribes (*Vimukta Jatis*) or Nomadic Tribes or Other Backward Classes category, by rotation, and one shall be woman :

Provided that, such representatives of management to be elected shall be the representatives of management of colleges which are accredited by National Assessment and Accreditation Council or National Board of Accreditation as the case may be :

Provided further that, where a management conducts one or more Colleges or institutions, only one representative of such management shall be eligible for being included in collegium of Management Representatives;

या तरतूदींना अनुसरुन आपल्या संस्थेचे अध्यक्ष किंवा सचिव किंवा व्यवस्थापनाच्या एका प्रतिनिधींची माहिती विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या नमून्यामध्ये सोमवार, दि. १९ जून, २०१७ ते मंगळवार, दि. १८ जुलै, २०१७ पर्यंत online पध्दतीने सादर करावी. तसेच त्या माहितीची छापील प्रत व्यवस्थापनाच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाच्या (विहित नमुन्यातील) प्रतिसह विद्यापीठ कार्यालयाकडे शनिवार, दि. २२ जुलै, २०१७ पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहोचेल अशा रितीने पाठवावी. आवश्यकता भासल्यास खास दुताकरवी माहिती पाठवावी. ठरावाच्या प्रतीवर व्यवस्थापनाच्या सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षांची आणि सचिवांची स्वाक्षरी व इतर माहिती असणे आवश्यक आहे. **वरील तारखेनंतर आलेली माहिती, अपूर्ण माहिती व ठराव विहित नमुन्यात नसल्यास विचारात घेतली जाणार नाही आणि** त्यातील नावाचा मतदार यादीमध्ये समावेश केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम (२८)(२)(त)((28)(2)(p)) नुसार अधिसभा या प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडणूक लढविण्यासाठीच्या पात्रताशर्ती उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दि. २८ एप्रिल, २०१७ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये विहित केलेल्या आहेत.

आपणास पुढे असेही कळविण्यात येते की, व्यवस्थापनाच्या प्रतिनिधीने त्यांचा email id व मोबाईल नंबरची माहिती सोबत देणे आवश्यक आहे. ज्यांच्याकडे email id नसेल त्यांनी खालीलपैकी एखादया संकेतस्थळामार्फत स्वतःचा email id उपलब्ध करुन घ्यावा.

www.yahoo.com, www.hotmail.com, www.gmail.com

याबाबत काही शंका / अडचणी असल्यास विद्यापीठाच्या निवडणूक विभागास election@pun.unipune.ac.in या e-mail id वर मेल करावा अथवा इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी सेल (०२०-२५६०१३८७) या विभागाशी संपर्क साधावा.

यासदंर्भात पुढे असेही कळविण्यात येते की, एकदा मतदार यादी प्रसिध्द केल्यानंतर त्यामध्येही फक्त वर निर्देश केलेल्या तारखेपूर्वी कळविलेल्या नावात दुरुस्ती किंवा कळविलेल्या नावामध्ये काही नावे मतदार यादीतून वगळली गेली असल्यास किंवा कळविलेल्या नावामध्ये चुकीच्या नोंदी झालेल्या असल्यास व त्या संबंधीत संस्थेने किंवा संबंधीत प्रतिनिधीने विहित मुदतीत कार्यालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर दुरुस्तीबाबत विचार केला जाईल. मात्र वरील मुदतीनंतर नव्याने नावे कळविल्यास म्हणजेच पूर्वीच्या नावाऐवजी दुसऱ्या व्यक्तीचे नाव कळविल्यास अशा नावांचा समावेश कुठल्याही परिस्थितीत मतदार यादीत केला जाणार नाही, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

**(डॉ. अरविंद दि.शाळीग्राम)**
**प्रभारी कुलसचिव**

सोबत : ठरावाचा विहित नमुना.

(संस्थेच्या लेटर हेडवर)

<u>विहित नमूना</u>

## संस्थेचा/कार्यकारी मंडळाचा ठराव

**प्रस्ताव :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्था यांच्या व्यवस्थापन गटाने त्यांच्यामधून विद्यापीठ अधिसभेवर निवडून द्यावयाचे प्रतिनिधी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २८(२)(त) (Section 28(2)(p)) नुसार निवडणुकीसाठी मतदार म्हणून नाव नोंदणी करण्याकरिता नाव कळविण्याबाबत.

### <u>ठराव</u>

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २८(२)(त) (Section 28(2)(p)) नुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'अधिसभा' या प्राधिकरणावर निवडून द्यावयाच्या व्यवस्थापन प्रतिनिधीकरिता करण्यात येणा-या निर्वाचक गणाच्या मतदार यादीत (निवडणूक २०१७) समावेश करण्याकरिता आमच्या ------------------------------------------- ------------------------- या संस्थेचे व्यवस्थापन प्रतिनिधी म्हणून श्री./सौ. ------------------------------------------- ------------------------------------------- यांचे नाव एकमताने/बहुमताने ठरवून सदर ठराव पारित करण्यात आलेला आहे.

**सूचक :** ------------------------------------------

**अनुमोदक :** --------------------------------------

**अध्यक्ष** | **संस्थेचा शिक्का** | **सचिव**

संपूर्ण नाव :

सही :

संस्थेचे नाव :

संस्थेचा सांकेतांक क्रमांक (PUN Code):

दिनांक :

ठिकाण :

(सचिव) संपूर्ण नाव :

सही :